# अवघड वाटणारे शिक्षण घेणे व संशोधन करणे अनिवार्य- प्र -कुलगुरू डॉ.जी.एन.शिंदे

लातूर (दि.३१)- अवघड वाटणारेही शिक्षण घेणे व त्यामध्ये संशोधन करणे अनिवार्य आहे. आजच्या पिढीला याशिवाय पर्याय नाही, असे मत स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचे प्र -कुलगुरू डॉ.जी.एन.शिंदे यांनी व्यक्त केले. ते कॉक्सिटच्या १५ व्या स्थापना दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.
प्र-कुलगुरू प्रा.डॉ.जी.एन.शिंदे यांनी कॉलेजच्या यशाचे साक्षीदार असल्याचे नमूद करत गुणवत्तापुर्ण शिक्षण, गुणवत्ताधारक व जबाबदार नागरिक म्हणुन विद्यार्थ्यांना घडविण्याची महाविद्यालय चांगली जबाबदारी पार पडत असल्याचे सांगून कौतूक केले. संगणकशास्त्र व आयटीचे शिक्षण सर्वच क्षेत्रात उपयोगी पडत असल्याने इतर विषयाचे ज्ञान नवीन अभ्यासक्रमात घेण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांना परिपुर्ण ज्ञान मिळणार आहे. आजची तरूणपिढी ही संधीची वाट पहाणारी नसून संधी निर्माण करणारी आहे. अवघड वाटणारेही शिक्षण घेणे व त्यामध्ये संशोधन करणे याशिवाय आजच्या पिढीला पर्याय नाही.
कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.एन.एस.झुल्पे यांनी कॉलेजच्या स्थापनेपासून गुणवत्तायादीत आलेले विद्यार्थी, कॅम्पस मुलाखतीत सातत्याने विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश याच्या चढत्या आलेखाची माहिती दिली.
कार्यक्रमाचे पाहूणे प्रा.डॉ.बी.एस.नागोबा यांनी चांगला स्टाफ व चांगल्या विद्यार्थ्यांची निर्मीती हे कॉक्सिटचे मुख्य भांडवल असल्याचे नमूद केले. प्रा.डॉ.ई.यु.मासुमदार म्हणाले की, संस्थेचे चेअरमन डॉ. एम.आर.पाटील यांनी विचारशक्तीचे लावलेले रोपटे आज वटवृक्ष होण्यासाठी तयार होत आहे. कमी गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांनाही यश मिळवून देणारे हे एकमेव महाविद्यालय आहे.
संस्थेचे चेअरमन डॉ.एम.आर.पाटील अध्यक्षीय समारोपात म्हणाले की, माजी राष्ट्रपती थोर शास्त्रज्ञ डॉ.अब्दुल कलामांच्या २०२० व्हिजन प्रमाणे सर्वोत्तम गुणवत्ता क्षमतेने संस्थेचे कॉक्सिट, शारदा ज्युनिअर व शारदा इंटरनॅशनल स्कूल कार्यरत राहणार आहे.
यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.एम.आर.पाटील यांनी प्राचार्यपदाची जबाबदारी उपप्राचार्य डॉ.एन.एस.झुल्पे यांच्यावर सोपविली. कार्यक्रमाचे सुत्रसंचाल प्रा.के.एस.गोमारे व आभार प्रा.एन.व्ही.मोरे यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, पाहुणे म्हणुन यशवंत नागरी सहकारी बॅकेचे सदस्य मा.बाबुराव पाटील , शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.




प्र-कुलगुरू डॉ. गणेश शिंदे मार्गदर्शन करताना, व्यासपीठावर उजवीकडून
डॉ.बी.एस.नागोबा, चेअरमन डॉ.एम.आर.पाटील, डॉ.ई.यु.मासुमदार, प्राचार्य डॉ.एन.एस.झुल्पे.